# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०३/२०२४ (गुरूवार) दुपार**


---

### अवैधरीत्या देशी विदेशी दारुची विक्रीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

दिनांक २०/०३/२०२४ रोजी मा. श्री. अनिल म्हस्के सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांना मुखबिरद्वारे विश्वसनिय खबर मिळाली की, मौजा पिपळा केवळराम येथुन काही ईसम होन्डा शाईन मोटरसायकलवर देशी दारूची वाहतुक करून नागपुर ते बैतुल हायवेवरील शिवराज ढाबा येथे विक्रीकरिता घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून स्टाफने नागपुर ते बैतुल हायवे रोडवरील शिवराज धाब्याचे जवळ नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— किसना काशीराम बारंगे वय ३९ वर्ष रा. जवाहर वार्ड पांढुर्णा जि. पांढुर्णा (म.प्र.)** हा एका होन्डा शाईन कंपनीचे बिना नंबर प्लेटचे मोटरसायकलवर एका पांढऱ्या रंगाचे चुमडीमध्ये १) ७३ प्लास्टीकच्या सिलबंद निपा प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या ज्यावर देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ किंमती ७० रू. एकुण किंमती ५११०/— रू. चा मुद्देमालासह मिळुन आला. तसेच पोलीसांनी शिवराज ढाब्याची दारूबाबत झडती घेतली असता ढाब्याचे मागील बाजुस असलेल्या एका लाल रंगाच्या चुमडीमध्ये १) ROYAL STAG DELUXE WHISKY असे लेबल असलेल्या १८० मिली क्षमतेच्या काचेच्या सिलबंद १७ निपा विदेशी दारूने भरलेल्या प्रत्येकी किंमती १८०/— रु एकुण किंमती ३०६०/—रू. २) IMPERIAL BLUE SUPERIOR GRAIN WHISKY असे लेबल असलेल्या प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या काचेच्या सिलबंद एकुण २७ निपा विदेशी दारूने भरलेल्या प्रत्येकी किंमती १६० रू. एकुण किंमती ४३२०/— रू. तसेच तेथेच एका खाकी रंगाचे खरडयाचे बॉक्समध्ये TUBORG कंपनीच्या प्रत्येकी ५०० मिली क्षमतेच्या एकुण २४ बीअर कॅन प्रत्येकी किंमती १४५/—रू. एकुण किंमती ३४८०/— रू. चा मुद्देमाल हा आरोपीने अवैधरित्या विक्रीकरिता आणला असल्याचे सांगितल्याने **आरोपी किसना काशीराम बारंगे वय ३९ वर्ष रा. जवाहर वार्ड पांढुर्णा जि. पांढुर्णा (म.प्र.)** याचे ताब्यातुन विनापरवाना व अवैधरित्या मिळुन आलेल्या वरील प्रमाणे देशी व विदेशी दारू तसेच बिअर किंमती १५९७०/— रू. व एक होन्डा शाईन एसपी सीबी १२५ कंपनीची बिना नंबर प्लेटची मोटरसायकल अंदाजे किंमती ५००००/— रू. असा एकुण ६५९७०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**आरोपी १) किसना काशीराम बारंगे, वय ३९ वर्षे, रा. जवाहर वार्ड पांढुर्णा जि. पांढुर्णा (म.प्र.), फरार आरोपी ढाबा मालक २) दादू गणपतराव रेवतकर वय अंदाजे ५५ वर्षे, रा. भादी पिपळा मंगसा ता. सावनेर जि. नागपूर एच.एम. बस स्टँड समोर पांढुर्णा जि. पांढुर्णा (म.प्र.), ३) हेमराज पन्नालाल चौधरी,**

**वय ३८ वर्ष, रा. जवाहर वार्ड ग्याराह खोली पांढुर्णा जि. पांढुर्णा (म. प्र.)** यांचेविरूद्ध कलम ६५(अ), ६५(ई) म.दा.का. सहकलम १०९ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदशनात महिला पोलीस हवालदार संगिता कोवे, पोलीस अंमलदार नितेश पुसाम, महिला पोलीस अंमलदार अश्विनी वांढरे, चालक महेश डंभारे, पोलीस अंमलदार पियुश वाढीवे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर